प्रेस नोट दिनांक-०४/०४/२०१९

## बॉडीबिल्डींग करुन अग्निशस्त्र बाळगणाऱ्या एका इसमास हडपसर पोलीसांकडुन अटक

२०१९ लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर पुणे शहरातील निवडणुकीच्या काळात गंभीर गुन्हयांना प्रतिबंध करुन गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मा.सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त सो पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या विशेष मोहिमे अंतर्गत वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे यांनी गुन्हे प्रकटीकरणाचे प्रमुख सहा.पोलीस निरीक्षक संजय चव्हाण यांना सुचना केल्या होत्या.

त्याअनुषंगाने सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण व पोलीस शिपाई ब. नं. ७३१७ मुंढे यांना गोपनीय बातमी मिळाली की, म्हाडा कॉलनी चे गेट समोर वैदवाडी हडपसर येथे ससाणे नगर रोडवर एक इसम पिस्टल घेवुन उभा आहे अशी बातमी मिळाल्याने लागलीच हडपसर पोलीस स्टेशनकडील तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी म्हाडा कॉलनी हडपसर पुणे येथे सापळा लावुन संशयितरित्या थांबलेल्या इसम नामे कय्युम शब्बीर शेख वय ३० वर्षे रा. संभाजी नगर, मारुती मंदिराजवळ, नथुभाऊ भेगडे पाटील शाळेच्या मागे, तळेगाव दाभाडे ता. मावळ, जि. पुणे याची अंगझडती घेतली असता त्याचे अंगझडतीमध्ये देशी बनावटीचे पिस्टल व चार जिवंत काडतुसे असा एकुण २०,६००/- रुपये किंमतीचा मुददेमाल मिळुन आल्याने ते ताब्यात घेण्यात आले आहे.

ताब्यात घेण्यात आलेले इसम नामे कय्युम शब्बीर शेख वय ३० वर्षे रा. संभाजी नगर, मारुती मंदिराजवळ, नथुभाऊ भेगडे पाटील शाळेच्या मागे, तळेगाव दाभाडे ता. मावळ, जि. पुणे याचेविरुध्द हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ३०४/२०१९ भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५),महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार यांचे सुचनानुसार सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, पो.हवा. ८२३ युसुफ पठाण, पो. हवा. ३८६८ सपंत औचरे, पो. हवा. ५५६२ राजेश नवले, पो. ना. २८०० प्रताप गायकवाड, पो. ना. ५८९४ प्रमोद टिळेकर, पो. ना. ६४८९ विनोद शिवले, पो. ना. ६८७० सैदोबा भोजराव, पो. ना. ५७९१ राजु वेगरे,गणेश दळवी, पो. शि. ७३१७ नितीन मुंढे, पो. शि. ८६९२ अकबर शेख, पो. शि. ७५१२ गोविंद चिवळे, पो. शि.७६८४ शंशिकांत नाळे यांनी केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
हडपसर पोलीस स्टेशन, पुणे